# कारागिरांना मिळणार २ लाखापर्यंत कर्ज

## प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन




देशोन्नती वृत्तसंकलन...

**वाशिम** ■ प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजनेअंतर्गत जिल्ह्यातील नोंदणीकृत पात्र कारागिरांना कौशल्य विकास प्रशिक्षण, टूलकिट प्रोत्साहन अनुदान रु. १५ हजार आणि रु. २ लाखापर्यंत सवलतीच्या व्याजदराचे कर्ज मिळणार आहे. या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा अंमलबजावणी समितीच्या अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी एस. भुवनेश्वरी आणि सह-अध्यक्ष तथा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी केले आहे.

महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ वाशिम या विभागामार्फत या योजनेची अमलबजावणी करण्यात येत असून, याकरीता जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली 'जिल्हा अंमलबजावणी समिती' गठीत करण्यात आली आहे. जिल्ह्यातील अवजारे व साधने यांचा वापर करणारे कारागीर तसेच हातांनी काम करणाऱ्या पारंपारिक कारागीर तसेच हस्तकलेच्या लोकांना ओळख प्राप्त करुन देण्यासाठी आणि त्यांना सर्वांगीण आधार देऊन त्यांचा विकास करण्यासाठी भारत सरकारने 'प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजनेच्या नावाची नवीन योजना मंजूर केली आहे.

कारागिरांच्या उत्पादनांची गुणवत्ता, व्याप्ती आणि पोहोच सुधारणे आणि त्यांया सुक्ष्म, लघू व मध्यम उद्योगांना बाजरपेठ मिळवून देऊन त्यांचे मूल्य साखळीसोबत एकत्रिकरण करणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. ही योजना संपूर्णपणे भारत सरकारद्वारे अर्थसहाय्यित आहे. (का.प्र.)



तालुका स्तरावरुन गट विकास अधिकारी तसेच गाव पातळीवरील ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी यांनी याबाबत कार्यालयात नोटीस लावुन आपल्या कार्यक्षेत्रातील गरजवंत कारागिरांना या योजनेची माहिती देऊन लाभासाठी प्रोत्साहित करावे.

**वैभव वाघमारे**, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. वाशिम.

## योजनेमधून मिळणारे लाभ

पारंपारिक कारागीर म्हणून शासनाची मान्यता, विश्वकर्मा म्हणुन प्रमाणपत्र आणि ओळखपत्र, कौशल्य पडताळणी नंतर प्रशिक्षण, इच्छुक उमेदवार १५ दिवसाचे प्रशिक्षण, प्रशिक्षणा दरम्यान दररोज रु. ५०० विद्यावेतन, टूलकिट प्रोत्साहन १५,००० रुपये अनुदान, १ लाख आणि २ लाख रुपये कर्ज, डिजिटल व्यवहारांसाठी प्रोत्साहन असंघटित क्षेत्रात स्वयंरोजगार तत्त्वावर हाताने अथवा अवजारांनी काम करणारे, नोंदणीकृत कारागीर हे या योजनेचे लाभार्थी लाभार्थी असुन नोंदणीच्या तारखेस लाभार्थ्याचे किमान वय १८ वर्षे असावे असे शासनाचे निर्देश आहेत.

## पात्र कारागीर

सोनार, कुंभार, मोची, शूस्मिथ, पादत्राणे कारागिर, गवंडी, बास्केट, मॅट, झाडू निर्माता, काथ्याचा व्यकवसाय करणे, बाहुली आणि खेळणी निर्माता, न्हालवी माला निर्माता, परीट, शिंपी, मासेमारी जाळी बनवणारे, आवश्यक कागदपत्रांसह जवळच्या सीएससी केंद्रात ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ वाशिमच्यावतीने करण्यात आले.

लोकमत

# कुशल कारागिरांना दोन लाखापर्यंत कर्ज

## प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य योजनेचा युद्धस्तरावर जागर

लोकमत न्यूज नेटवर्क

**वाशिम :** प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजनेंतर्गत जिल्ह्यातील नोंदणीकृत पात्र कारागिरांना कौशल्य विकास प्रशिक्षण, टूलकिट प्रोत्साहन अनुदान म्हणून १५ हजार आणि २ लाखापर्यंत सवलतीच्या व्याजदराचे कर्ज मिळणार आहे. या योजनेचा जिल्हाभरात युद्धस्तरावर जागर केला जात असल्याची माहिती अंमलबजावणी समितीचे सहअध्यक्ष तथा जि. प.चे सीईओ वैभव वाघमारे यांनी दिली.

महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळामार्फत योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा अंमलबजावणी समिती गठीत करण्यात आली आहे. अवजारे व विविध साधनांचा वापर करणारे कारागीर आणि हस्तकलेच्या कारागिरांना ओळख प्राप्त करून देण्यासाठी प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजना अंमलात आली.



### योजनेतून कोणते लाभ मिळतात?

योजनेंतर्गत पारंपरिक कारागीर म्हणून शासनाची मान्यता, प्रमाणपत्र व ओळखपत्र, कौशल्य पडताळणीनंतर प्रशिक्षण, प्रशिक्षणादरम्यान दैनंदिन ५०० रुपये विद्यावेतन, १५ हजार रुपये टूलकिट प्रोत्साहन, १ व २ लाखांचे कर्ज आदी लाभ देय आहेत.

### सीएससी केंद्रात करा अर्ज

पात्र कारागीरांनी आवश्यक कागदपत्रांसह नजीकच्या सीएससी केंद्रात ऑनलाइन अर्ज करणे आवश्यक आहे, असे महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळाकडून कळविण्यात आले.

### कोण घेऊ शकतो लाभ?

सोनार, कुंभार, मोची, गवंडी, मॅट व झाडू निर्माता, बाहुली व खेळणी निर्माता, न्हावी, माला निर्माता, परीट, शिंपी, मासेमारी जाळी बनविणारे कारागीर योजनेचा लाभ घेण्यास पात्र आहेत.



गटविकास अधिकारी, ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकाऱ्यांनी योजनेबाबत कार्यालयात नोटीस लावून कार्यक्षेत्रातील गरजवंत कारागीरांना योजनेची माहिती द्यावी. तसेच लाभासाठी प्रोत्साहित करावे.

**- वैभव वाघमारे,**
मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प., वाशिम

अजिंक्य भारत

# वाशिम फोकस

रविवार, ३ मार्च २०२४



## जिल्ह्यातील कारागिरांना मिळणार २ लाखापर्यंत कर्ज

# कारागीर आहात पण भांडवल नाही? मग पीएम विश्वकर्मा कौशल्य योजनेचा लाभ घ्या!

**वाशिम** प्रतिनिधी

प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजनेअंतर्गत जिल्ह्यातील नोंदणीकृत पात्र कारागिरांना कौशल्य विकास प्रशिक्षण, टूलकिट प्रोत्साहन अनुदान रु. १५ हजार आणि रु. २ लाखापर्यंत सवलतीच्या व्याजदराचे कर्ज मिळणार आहे. या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा अंमलबजावणी समितीच्या अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी एस. भुवनेश्वरी आणि सह-अध्यक्ष तथा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी केले आहे. महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ वाशिम या विभागामार्फत या योजनेची अमलबजावणी करण्यात येत असुन याकरीता जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली "जिल्हा अंमलबजावणी समिती" गठीत करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील अवजारे व साधने यांचा वापर करणारे कारागीर तसेच हातांनी काम करणाऱ्या पारंपारिक कारागीर तसेच हस्तकलेच्या लोकांना ओळख प्राप्त करुन देण्यासाठी आणि त्यांना सर्वांगीण आधार देऊन त्यांचा विकास करण्यासाठी भारत सरकारने प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजनेच्या नावाची नवीन योजना मंजूर केली आहे. कारागिरांच्या उत्पादनांची गुणवत्ता, व्याप्ती आणि पोहोच सुधारणे आणि त्यांना सुक्ष्म, लघू व मध्यम उद्योगांना बाजरपेठ मिळवून देऊन त्यांचे मूल्य साखळीसोबत एकत्रिकरण करणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. ही योजना संपूर्णपणे भारत सरकारद्वारे अर्थसहाय्यित आहे. योजनेमधुन मिळणारे लाभ: असंघटित क्षेत्रात स्वयंरोजगार तत्त्वावर हाताने अथवा अवजारांनी काम करणारे, नोंदणीकृत कारागीर हे या योजनेचे लाभार्थी लाभार्थी असुन नोंदणीच्या तारखेस लाभार्थ्यांचे किमान वय १८ वर्षे असावे असे शासनाचे निर्देश आहेत. आवश्यक कागदपत्रांसह जवळच्या सीएससी केंद्रात ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ वाशिमच्या वतीने करण्यात आले आहे.

> तालुका स्तरावरुन गट विकास अधिकारी तसेच गाव पातळीवरील ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी यांनी याबाबत कार्यालयात नोटीस लावुन आपल्या कार्यक्षेत्रातील गरजवंत कारागिरांना या योजनेची माहिती देऊन लाभासाठी प्रोत्साहित करावे.
>
> **वैभव वाघमारे,** मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. वाशिम

**पात्र कारागीर/व्यवसाय:**

- सोनार
- कुंभार
- मोची/शूस्मिथ/पादत्राणे कारागिर
- गवंडी
- बास्केट/मॅट/झाडू निर्माता /काथ्या चा व्यकवसाय करणे
- बाहुली आणि खेळणी निर्माता
- न्हालवी
- माला निर्माता
- परीट
- शिंपी
- मासेमारी जाळी बनवणारे

## पारंपारिक कारागीर म्हणून शासनाची मान्यता

- विश्वकर्मा म्हणुन प्रमाणपत्र आणि ओळखपत्र
- कौशल्य पडताळणी नंतर प्रशिक्षण
- इच्छुक उमेदवार १५ दिवसाचे प्रशिक्षण
- प्रशिक्षणादरम्यान दररोज रु. ५०० विद्यावेतन
- टूलकिट प्रोत्साहन : १५,००० रुपये अनुदान
- रु. १ लाख आणि २ लाख रुपये कर्ज
- डिजिटल व्यवहारांसाठी प्रोत्साहन